सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी व औषधनिर्माण शास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी MT-CET या प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
शासन निर्णय क्र:संकीर्ण-२०११/प्र.क्र.३३७/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०० ०३२
दिनांक : ३१ ऑक्टोबर २०१२

वाचा :-
१) उच्च शिक्षण विभाग, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एफ.५-१/२०११-पीएन.१, दि. २७.०२.२०१२
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र २अ/एडीएम/२०११/३३६, दि. १३.०३.२०१२
३) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र २अ/एडीएम/२०१२/४५९, दि. ०७.०४.२०१२
४) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण २०११/प्र.क्र.३३७(अ)/तांशि-४, दि. ०२.०५.२०१२
५) उच्च शिक्षण विभाग, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची अधिसूचना क्र. एफ.२१-६/२०१२-टीएस.१, दि. १४.०८.२०१२

**प्रस्तावना :-** भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाने प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी केंद्रीय स्तरावर संयुक्त प्रवेश परीक्षा (JEE) घेण्याचे निश्चित केले आहे. केंद्र शासनाने शैक्षिणक वर्षे २०१३-१४ पासून देशातील सर्व IIT तसेच केंद्र शासन अर्थसहाय्यित शैक्षणिक संस्थांमध्ये अभियांत्रिकी प्रथम वर्ष अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया संयुक्त प्रवेश परीक्षा (JEE) मार्फत करण्याचे ठरविले आहे. या प्रवेश प्रक्रियेत सन २०१४-१५ पासून सहभागी होण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून राज्यातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येणा-या संयुक्त प्रवेश परीक्षेच्या (Joint Entrance Examination) आधारे करण्यात येणार आहेत. आतापर्यंत राज्यामध्ये अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र तसेच वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षेचे सक्षम प्राधिकारी म्हणून संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य हे काम पाहत होते. तथापि, २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील वैद्यकीय अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा (NEET) मार्फत घेण्याचे निश्चित झाले आहे. त्यामुळे सन २०१३-१४ मध्ये संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य हे MHT-CET ही प्रवेश परीक्षा घेणार नाहीत. त्यामुळे अभियांत्रिकी व औषधनिर्माण शास्त्र या अभ्यासक्रमाचे सन २०१३-१४ मधील प्रथम वर्ष पदवींचे प्रवेश तसेच औषधनिर्माण शास्त्र या अभ्यासक्रमाचे यापुढील प्रथम वर्ष पदवीचे प्रवेश MT-CET या प्रवेश परीक्षेमार्फत होणार असल्याने या परीक्षेचे आयोजन करण्याची जबाबदारी संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांची राहणार आहे. त्याकरीता संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :** राज्यात सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षामध्ये अभियांत्रिकी व औषधनिर्माण शास्त्र या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष पदवी प्रवेशासाठी घ्यावयाच्या MT-CET प्रवेश परीक्षेचे सक्षम प्राधिकारी म्हणून संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना घोषित करण्यात येत आहे. या प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत निर्माण करावी. सदर प्रवेश परीक्षेचे नियोजन, संनियंत्रण, परीक्षेचा निकाल, विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन इत्यादी जबाबदा-या संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या राहतील. या प्रयोजनासाठी संचालनालयामध्ये स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात यावा. तसेच क्षेत्रिय स्तरावर या प्रवेश परीक्षेच्या आयोजनाच्या दृष्टीने सर्व जिल्हाधिका-यांशी संपर्क साधून त्यांना संचालक, तंत्र शिक्षण यांनी योग्य त्या सूचना पारीत कराव्यात.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२१०३११५३२१४८३०८ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

(म. मा. मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
अतिरिक्त मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती)
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये (सर्व)
आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त,आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
संचालक, माध्यमिक व उच्च् माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्य मंडळ, पुणे
कुलगुरु, सर्व विद्यापीठे
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त कार्यालय, १ला मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मुंबई – ४०००३२ (पत्राने)
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक
उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती/तांशि-४